*"तुम्ही मला शरण याल आणि पूर्ण जिवें भावें माझ्या शोधास लागाल, तेव्हां मीं तुम्हांस पावेन."*

# देवाला कसे ओळखल.

# ''देवाला कसे ओळखाल''

ज्या प्रमाणे आब्राहाम ''समर्पण व आज्ञापालनाच्या व्दारे'' देवाचा मित्र होता त्या प्रमाणे तुम्हीं देखील देवाला ओळखून त्याची दया, शान्ती आणि आशीर्वाद यांचा अनुभव करूं शकतां. देवाला संपूर्ण समर्पण करून त्याच्यावर विश्वास करणे हा जीवनांतील सर्वात महात्वाचा अनुभव आहे. किती अद्‌भुत गोष्ट आहे, की, जे लोग देवाचा शोध अंत:करणापासून करतात त्यांना देव स्वत:चे प्रगटीकरण करतों. जर आपण स्वत:च्या मार्गांनी जाणे सोडून देवाला संपूर्ण समर्पण केले तर त्याच्या आत्मा आम्हां मध्ये वास करेल. त्याच्या आज्ञेत राहून जर आपण मागे चाललो, व त्याच्या वचनांवर विश्वास ठेविला तर त्याच्या प्रेमापासून आम्हाला कांही सुद्धा विभक्त करूं शकत नाहीं. तो तुमचा देव होईल आणि तुम्ही त्याची मुल्यवान ठेव व्हाल. तुम्हाला हे कळेल की त्याने तुम्हाला मोठी कींमत देउन विकत घेतले आहे. व तो तुमच्या सोबत सहभागीता करू इच्छीतो आता व सदासर्वकाळ:

देवाच्या पवित्र शास्त्रातील या वचनांचा आभ्यास करत असतांना ते समजण्यासाठी देवापासून ज्ञानाची मागणी करा. देवाने आपल्या संत्ताच्या व्दारे ही वचने लीहून घेतली आणी सैतानाच्या व्दारे ही वचने नष्ट करण्याचे अनेक प्रयत्न होत असत्तांनाही देवाने ही वचने पीढयांपासून जपून ठेविली आहेत.

---

All scriptures are taken from the Marathi Bible with permission from the Bible Society of India.

# केवळ एकच खरा देव आहे.

''आपला देव परमेश्वर हा अनन्य परमेश्वर आहें. तू आपला देव परमेश्वर याजवर पूर्ण मनानें, पूर्ण जिवाने व पूर्ण शक्तीने प्रीति कर.''

–अनुवाद ६:४ ब, ५

''आकाशाचा उत्पन्नकर्ता तोच देव, पृथ्वीचा घडणारा व कर्ता तोच, त्यानें तिची स्थापना केली; त्याने ती निर्जन रहावी म्हणून उत्पन्न केली नाही. तर तिजवर लोकवस्ती व्हावी म्हणून घडिली. हा परमेश्वर म्हाणतो, मीच परमेश्वर आहें; अन्य कोणी नव्हें.'' – यशया ४५:१८

''यावरून या भूतलावरील सर्व राष्ट्रे समजतील की परमेश्वर हाच देव आहे अन्य कोणी नव्हें.''

–१ ले राजे ८:६०

''मी परमेश्वर आहे, हे माझें नाम आहे; मी आपले गौरव दुसऱ्यास देऊं देणार नाही; मी आपली प्रशंसा मूर्तीस प्राप्त होऊं देणार नाही.''

–यशया ४२:८

''परमेश्वराचे असे म्हणणे आहे की तुम्ही मला ओळखावे, मजवर भाव ठेवावा व मी तोच आहे, माझ्यापूर्वी कोणी देव नव्हता व माझ्या नंतरही कोणी होणार नाहीं हे तुम्हाला समजावे म्हणून तुम्ही माझे साक्षी आहा, तू माझा निवडलेला सेवक आहे. मीच परमेश्वर आहें, माझ्या शिवाय कोणी त्राता नाहीं.''

–यशया ४३:१०,११

''पृथ्वीच्या सर्व सीमांनो, मजकडे वळा, उद्धार पावा, कारण मी देव आहे, अन्य कोणी नव्हें.''– यशया ४५:२२

# देव अनुग्रह करणारा व दयापूर्ण आहें.

"परमेश्वर कनवाळू व कृपाळू, मंदक्रोध व दयामय आहें. कारण जसे पृथ्वीच्यावर आकाश फार उंच आहे, तशी त्याची दया त्याचे भय धरणाऱ्यांवर विपुल आहे."

–स्त्रोत्रसंहिता १०३:८, ११

"परन्तु परमेश्वराची दया त्याचे भय धरणाऱ्यांवर युगानुयुग असते. त्याचा करार जे पाळतात आणि त्याच्या विधीचे स्मरण ठेवून त्यांप्रमाणे चालतात त्यास तो घडतो."

–स्त्रोत्रसंहिता १०३:१७अ १८ब

"तुजसमान देव कोण आहे ? तूं अधर्माची क्षमा करितोस....कारण त्याला दया करण्यांत आनंद वाटतो."

–मीखा ७:१८

"आम्ही भस्म झालो नाही ही परमेश्वराची दया होय, कारण त्याच्या करुणेस खंड पड़त नाही. ती रोज सकाळी नवी होते; तुझी सत्यता थोर आहें."

–विलापगीत ३:२२, २३

"तो जरी दुख देतो तरी तो आपल्या दयेच्या वैपुल्यानुसार करुणा करितो."

–विलापगीत ३:३२

"दयाळू जनाशी तूं दयेने वागतोस"

–स्तोत्रसंहिता १८:२५अ

"परमेश्वरचे उपकार करा, कारण तो चांगला आहे, त्याची दया सनातन आहे."

–१ला इतिहास १६:३४

"मला ठाऊक होते की तूं कृपाळू, कनवाळू, मंदक्रोघ दयासंपन्न, आरिष्ट आणिल्या बद्दल अनुताप करुन घेणारा असा देव आहेस."

–योना ४:२ब

# ''देव तुम्हावर प्रिती करतो''

''परमेश्वराने दुरुन येऊन मला दर्शन दिले, तो म्हणाला, मी सार्वकालिक प्रेमवृत्तीने तुजवर प्रेम करीत आलो म्हणून मीं तुला वात्सल्याने जवळ केले आहे.'' —यिर्मया ३१:३

''परमेश्वर म्हणतो, तुम्हाविषयी माझ्या मनांत जे संकल्प आहेत ते मी जाणतो, ते संकल्प हिताचे आहेत, अनिष्टाचे नाहीत, ते तुम्हास तुमच्या भावी सुस्थितीची आशा देणारे आहेत.''

—यिर्मया २९:११

''परमेश्वर म्हणतो मी तुम्हावर प्रिती केली''

—मलाखी १:२ (अ)

''जसा बाप आपल्या मुलांवर ममता करितो तसा परमेश्वर आपले भय धरणाऱ्यांवर ममता करितो.'' —स्तोत्र १०३:१३

''पाहा, माझ्या बऱ्यासाठीच ही पीडा मला झाली तूं माझा जीव नाशगर्गेतून मायेने उध्दारीला कारण **तू माझी सर्व** पापें आपल्या पाठीकडे टाकिली आहे.'' —यशया ३८:१७

''देवाला आपल्या विषयी जी प्रिती आहे ती आपल्याला कळते व आपण तिच्यावर विश्वास ठेविला आहे. त्याने पहिल्याने आपणांवर प्रीति केली, म्हणून आपण प्रीती करितो.''

—१ ले योहान ४:१६ अ, १९

''परमेश्वर तुझा देव, सहाय्य करणाऱ्या वीरा सारखा तूझ्या ठायी आहे; तो तुजविषयी आनंदोत्सव करील; त्याचे प्रेम स्थिर राहील, तुजविषयी त्याला उल्लास वाटून तो गाईल.'' —सफन्या ३:१७

''हे देवा तुझे वात्सल्य कित्ती अमोल आहे.''

—स्तोत्रसंहिता ३६:७ (अ)

# "जीवनात सर्वश्रेष्ठ बाब देवाला ओळखणे आहे."

"जे लोक आपल्या देवास ओळखितात ते बलवान होऊन थोर कृत्ये करितील."

—दानीएल ११:३२अ

"मी दया करणारा व पृथ्वीवर धर्म व न्याय चालवविणारा परमेश्वर आहे, याची त्याला जाणीव आहे, ओळख आहे, याचा अभिमान बाळगावा, यात मला संतोष आहे, असे परमेश्वर म्हणतो."

—यिर्मया ९:२४

"धन्य ते जन, जे त्याचे निर्बंध पाळून त्याला मन:पूर्वक शरण जातात."

—स्तोत्रसंहिता ११९:२

"आज मी तुम्हांस सांगतो की जीवन आणि मरण, आशीर्वाद आणि शाप हीं तुजपुढें ठेविली आहेत, तूं जीवन निवडून घे म्हणजे तूं व तुझा वंश जीवंत राहील, आपला देव परमेश्वर याजवर प्रेम कर त्याची वाणी ऐक व त्यास धरून राहा, कारण त्यातच तुझे जीवन आहे."

—अनुवाद ३०:१९ ब, २० अ

"मी यज्ञाचा नाही तर दयेचा भुकेला आहे, होमार्पणां पेक्षा देवाचें ज्ञान मला आवड़ते."

—होशेय ६:६

"हरिणी जशी पाण्याच्या प्रवाहांसाठी लुलपते तसा हे देवा, माझा जीव तुझसाठी लुलपत आहें."

—स्तोत्रसंहिता ४२:१

"परमेश्वर म्हणाला, मी प्रत्यक्ष येईन आणि तुला विश्रांती देईन."

—निर्गम ३३:१४

# "देवाशीवाय स्वाधीन जीवन जगणे भयानक आहें"

"तुम्ही परमेश्वराच्या बरोबर राहाल तोंवर तो तुमच्या बरोबर राहील; तुम्ही त्यास शरण जाल तर तो तुम्हांस पावेल, पण तुम्ही त्यास सोडाल तर तो तुम्हांस सोडील."

—२ रा इतिहास १५:२ ब

"ऱ्हदय सर्वात कपटी आहे, ते असाध्य रोंगाने ग्रस्त आहे, त्याचा भेद कोणास समजतो?"

—यिर्मया १७:९

"मनुष्याला एक मार्ग सरळ दिसतो, पण त्याच्या शेवटास मृत्युपथ फुटतात."

—नीतिसुत्रे १६:२५

"ज्या देवदूतांनी पाप केले त्यास देवाने सोडिले नाही तर त्यांस नरकांत टाकिले आणि न्यायनिवाडया करिता राखून अंधकारमय ख़ळग्यांत ठेविले, भक्तिमान लोकांस परीक्षेतुन सोडविणे व अधार्मिक लोकांस शिक्षा भोगीत न्यायाच्या दिवसासाठी राखून ठेवणें हें प्रभुला कळतें."

—पेत्राचे दुसरे पत्र २:४, ९

"परंतु तुम्ही परमेश्वराची वाणी ऐकणार नाही आणि परमेश्वराच्या धर्मशास्त्रा विरुद्ध बंडावा कराल तर परमेश्वराचा हात जसा तुमच्या वाडवडिलां विरुद्ध झाला होता तसा तुमच्याही विरूद्ध होईल."

—१ले शमुविल १२:१५ अ

"कोणी मजमध्ये राहिला नाही तर त्याला फाटयाप्रामाणे बाहेर टाकितात, व तो वाळून जातो, मग त्यास गोळा करून अग्नीत टाकितात व ते जळून जातात."

—योहान १५:६

"पातकी तर एकंदरीने नष्ट होतील; दुर्जनांचा वंश छेदिला जाईल."

—स्तोत्रसांहिता ३७:३८

## ''परमेश्वराला ओळखण्यासाठी त्याचा शोध करणे आवश्यक आहें.''

''तुम्ही मला शरण याल आणि पूर्ण जिवे भावें माझ्या शोधास लागाल, तेव्हां मी तुम्हास पावेन.''
—यिर्मया २९:१३

''जर तू रूप्याप्रमाणे त्याचा शोध करिशील, व गुप्त निधींप्रमाणे त्याला उमगून काढिशील तर परमेश्वराच्या भयाची तुला जाणीव होईल आणि देवाविषयींचे ज्ञान तुला प्राप्त होईल.''
—नीतिसूत्रे २:४, ५

''मागा म्हणजे तुम्हास दिले जाईल. शोधा म्हणजे तुम्हांस सांपडेल, ठोका म्हणजे तुम्हास उघडलें जाईल.'' —मत्तय ७:७

''आणि विश्वासावाचून त्याला संतोषविणे अशक्य आहे, कारण देवाजवळ जाणाराने असा विश्वास धरिला पाहिजे कीं तो आहे, आणि त्याजकडे धाव घेणाऱ्यांला तो प्रतिफळ देणारा होतो.''
–इब्री ११:६

''जे परमेश्वराची आशा धरुन राहतात त्यांस, जो जीव त्याला शरण जातो त्यास परमेश्वर प्रसन्न होतो.'' –लापगीत ८:१७

''आणि एका पासून मनुष्यांची सर्व राष्ट्रे उत्पन्न करुन त्यांनी सगळया भूपृष्ठभागावर रहावे असे त्याने केले. अशा साठी कीं त्यांनी देवाचा शोध करावा, म्हणजे चाचपडत चाचपडत त्याला कसें तरी मिळवून हयावें, तो आपल्यातल्या कोणापासूनही दूर नाहीं.''
—प्रेषितांची कृत्ये १७:२६ अ, २७

''मी तर ईश्वराचा धावा केला असता; मीं देवावर हवाला टाकिला असता.'' —ईयोब ५:८

# ''आपण त्याच्या जवळ जावे असे देवाला वाटते''

''कारण तुमचा देव परमेश्वर कृपाळू व दयाळू आहे, आणि तुम्ही त्याच्याकडे वळला तर तो आपले मुख तुमच्या कडून फिरविणार नाही.''

—२ रा इतिहास ३०:९ ब

''हे प्रभु तू उत्तम व क्षमाशील आहेस आणि तुझा धावा करणऱ्या सर्वांवर विपुल दया करणारा आहेस.'' —स्तोत्रसंहिता ८६:५

''जे कोणि त्याचा धावा करितात, ते खऱ्या भावानें त्याचा धावा करितात, त्या सर्वास परमेश्वर समीप आहें.'' —स्तोत्रसंहिता १४५:१८

''परमेश्वर म्हणतो, चला, या, आपण बुध्दिवाद करुं, तुमची पातके लाखेसारखी लाल असली तरी ती बर्फासारखीं पांढरी होतील, तीं किरमिजासारखी तांबडी असली तरी लोकरी सारखी निघतील.'' —यशया १:१८

''अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुमही सर्व मजकडे या, म्हणजे मी तुम्हांला विश्रांति देईन. मी जो मनाचा सौम्य व लीन आहें त्या माझें जूं आपणांवर ह्या व मजपासून शिका, म्हणजे ''तुमच्या जिवांस विश्रांति मिळेल.''

—मत्तय ११:२८, २९

''जो मजकडे येतो त्याला मी घाल विणार नाहीच.''

—योहान ६:३७ब

''अहो तन्हिल्यांनो, तुम्ही सर्व जलाशया कडे या, जवळ पैका नसलेले तुम्ही या, सौदा करा, खा, या, पैक्यावांचून व मोलावांचून द्राक्षरसाचा व दुधाचा सौदा करा.'' —यशया ५५:१

# देव पवित्र आहे

"हे परमेश्वरा, देवांमध्ये तुजसारखा कोण आहे?
...पावित्र्यामुळे वैभवी?"

—निर्गम १५:११

"परमेश्वरा सारखा पवित्र कोणी नाही, कारण तुझ्या शिवाय कोणी नाहीच"

—१ ले शमुवेल २:२अ

"देवाकडून दुष्कर्म व्हावे, सर्वसमर्थाकडून अन्याय व्हावा, ही कल्पनाही करावयाला नको."

—ईयोब ३८:१०व

"पवित्र! पवित्र! पवित्र! सेनाधीश परमेश्वर! अखिल पृथ्वीची समृद्धि त्याचि वैभव होय."

—यशया ६:३ब

"कारण जो उच्च परम थोर आहे, जो अक्षय स्थितींत वास करतो, ज्यांचें नाम पवित्र प्रभु आहे, तो असे म्हणतो: मी उच्च व पवित्र स्थानी वसतो"

—यशया ५७:१५अ

"एक म्हणजे देव, त्याजवांचून कोणी उत्तम नाही."

—मार्क १०:१८ब

"हे प्रभो, तुला कोण भिणार नाही? तुझ्या नामाचा महिमा कोण करणार नाही? कारण "पवित्र" असा कायतो तूंच एक आहेस."

—प्रकटीकरण १५:४अ

"ते तुझे थोर व भयप्रद नाम स्तवोत, तो पवित्र आहे."

—स्तोत्र संहिता ९९:३

"परमेश्वर आपला देव याची थोखी गा... कारण परमेश्वर आमचा देव पवित्र आहे.

"पवित्र, पवित्र, पवित्र, जो होता, आहे व येतो, तो 'प्रभु देव' सर्वसत्ताधारी,"

—प्रकटीकरण ४:८व

''एक देव आहे, असा विश्वास तूं धरितोस हें बरें करितोस, भूतेंही विश्वास धारितात व कांपतात, अगे असमंजस मनाच्या मनुष्या, क्रियांवाचून विश्वास निरर्थक आहे हे समजावयास तुला हवें काय? वचना प्रमाणे आचरण करणारे असा, केवळ ऐकणारे असूं नका; अशानें तुमची भुलवणूक होते''

—याकोबाचे पत्र २:१९, २०; १:२२

''दुर्जनांचा मार्ग परमेश्वराला वीट आणितो, पण जो नीतीला अनुसरतो तो त्याला प्रिय आहे.''

—नीतिसूत्रे १५:९

''मला त्याचे ज्ञान आहे असें म्हणून त्यात्या आज्ञा जो मानीत नाही तो लबाड आहे, त्याच्या ठायी सत्य नाही.''—योहानाचे पहिलें पत्र २:४

''यावरुन देवाची मुले व सैतानाची मुले उघड होतात. जो कोणी नीतीने वागत नाहीं तो देवापासून नाही, व जो आपल्या बंधूवर प्रीति करीत नाही तोही नाहीं.'' —योहानाचे पहिले पत्र ३:१०

''सर्वा बरोबर 'शांतीने राहणें' व ज्यावांचून कोणास प्रभूचे दर्शन होत नाही असे पवित्रीकरण, त्याच्या पाठीस लागा.'' —इब्री १२:१४

''तर ज्यानें तुम्हांस पाचारण केलें तो जसा पवित्र आहे तसे तुम्हीही सर्व प्रकारच्या आचरणांत पवित्र व्हा,'' —१ले पेज १:१५

''तुम्हीं वांचवें म्हणून बऱ्याच्या मागे लागा; वाईटाच्या मागे लागूं नका, म्हणजे तुम्ही म्हणता त्या प्रमाणे परमेश्वर सेनाधीश देव तुम्हाबरोबर असेल.'' —आमोस ५:१४

''त्याच्या पवित्र स्थानात कोण उभा राहील? ज्याचे हात स्वच्छ आणि मन शुद्ध आहे?

—स्तोत्रसंहिता २४:३ब; ४अ

# देव ज्यां विषयी आज्ञा देतो

''नीतीने वागणे, आवडीने दया करणे व आपल्या देवासमागमे राहून नम्रभावाने चालणे यांवाचून परमेश्वर तुजजवळ काय मागतो?''
—मीखा ६:८ब

''तुम्ही पवित्र असावें, कारण मी परमेश्वर तुमचा देव पवित्र आहें'' —लेविय १९:२ब

''तूं आपला देव परमेश्वर याजवर पूर्ण मनाने, पूर्ण जिवाने, पूर्ण शक्तीने व पूर्ण बुद्धीने प्रीति कर'' —लूक १०:२७

''आज्ञा तुला ठाऊक आहेत, 'मनुष्यहत्या' करुं नको, व्यभिचार करुं नको, चोरी करुं नको, खोटी साक्ष देऊं नको, 'ठकवू नको, आपला बाप व आपली आई यांचा मान राख.''
—मार्क १०:१९

''या युगाबरोबर समरुप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नविकरणानें स्वत:चे रुपांतर होऊं द्या.'' —रोमकरांस पत्र १२:२अ

''नियमशास्त्राचा हा ग्रंथ तुझ्या मुखांतून कदापि ढळूं नये; त्यांत जें कांही लिहिले आहें तें तूं मान्य करुन पाळावें, म्हणून रात्रंदिवस तूं त्यांचें मनन करावें, म्हणजे तुझा मार्ग सुखाचा होऊन तुला यश:प्राप्ति घडेल''
—यहोशवा १:८

''देवावर विश्वास ठेवां.''
—मार्क ११:२२ब

''तू आपला देव परमेश्वर याची उपासना करावी'' —निर्गम २३:२५अ

# "देव ज्याचा व्देष करतो"

"परमेश्वर ज्यांचा द्वेष करितो अशा सहा गोल्टी आहेत; नव्हे, त्याला अशा सात गोष्टींचा वीट आहे. उन्मत्त दृष्टी, लबाड बोलणारी जीव्हा, निर्दोष रक्त पाडणारे हात, दुष्ट योजना करणारे अंतःकरण, दुष्कर्म करण्यास त्वरेनें धावणारे पाय. लबाड बोलणारा खोटा साक्षी, व भावांभावांत वैमनस्य उत्पन्न करणारा मनुष्य, ह्या त्या होत."

—नीतिसूत्रे ६:१६-१९

"कारण मला परमेश्वराला, न्याय प्रिय आहे, अन्यायाच्या लुटीचा मला वीट आहे."

—यशया ६१:८अ

"परंतु भेकड, विश्वास न ठेवणारे, अमंगळ, खून करणारे, जारकर्मी, चेटकी, मूर्तिपुजक, व सर्व लबाड यांस 'अग्नीच्या व गंधकाच्या जळत्या' सरोवरांत वांटा मिळेल, हे दुसरे मरण आहे."

—प्रकटीकरण २१:८

"याकरिता आपल्या आत्म्याला जपावें, व आपल्या तरुण पणाच्या पत्नीचा कोणी विश्वासघात करुं नये. परमेश्वर ... म्हणतो मला सूटपत्राचा तिटकारा आहें" —मलाखी २:१५व, १६अ

"तुम्ही कोणी मनांत आपल्या शेजाऱ्याचें अनिष्ट चिंतूं नका, खोटया शपथेची आवड धरु नका, कारण या सर्वांचा मला तिटकारा आहे. असे परमेश्वर म्हणतो" —जखऱ्या ७:१५

"तुम्ही आपणांस मनुष्यां समक्ष धार्मिक ठरवून घेणारे आहां, परंतु देव तुमची अंतःकरणे ओळखून घेतो, मनुष्यास जें उच्च असे वाटते तें देवाच्या दृष्टीने ओंगळ आहे." —लूक १६:१५

# जेव्हा लोक देवाची अपेक्षापूर्ती करत नाहीत

"तरी तुमच्या ठायीं देवावरची प्रीति नाहीं हें तुम्हांसंबंधाने मला माहीत आहें.'

—योहान ५:४२

"जो कोणी संपूर्ण नियमशास्त्र पाळून एका नियमाविषयी चुकतो तो सर्वां विषयी दोषी होतो." —याकोबाचे पत्र २:१०

"तेंव्हा मी म्हणालो, हाय हाय! माझें आतां वाईट झालें, कां तर मी अशुद्ध ओठांचा मनुष्य आहें आणि मी अशुद्ध ओठांच्या लोकांत राहतों; सेनाधीश परमेश्वर, राजाधीराज ह्यास मीं आपल्या डोळयांनीं पाहिलें," —यशया ६:५

"चांगले करणे कळत असून जो त्याप्रमाणे वागत नाहीं त्याला तें पाप आहे."

—याकोबाचे पत्र ४:१७

"शास्त्रलेख म्हणतो, "नीतिमान कोणी नाही, एक देखील नाही" —रोमकरांस पत्र ३:१०

"कारण सर्वांनी पाप केले आहे, आणि देवाच्या गौरवाला ते अंतरले आहेत."

—रोमकरांस पत्र ३:२३

"जो कोणी नीतिने वागत नाहीं तो देवापासून नाहीं, व जो आपल्या बंधूवर प्रीति करीत नाही तोही नाही" —१ले योहान ३:१०ब

"आम्ही सर्व मेंढरांप्रमाणे बहकून गेलों होतों, आम्ही प्रत्येकानें आपआपला मार्ग धरिला होता."

—यशया ५३:६अ

"या परमेश्वरा समोर, या पवित्र देवासमोर कोण टिकेल?" —१ ले शमुवेल ६:२०व

# "आमच्या स्वकर्मांनी देव संतुष्ट होत नाही"

"मीं त्यांजविषयी साक्ष देतों कीं त्यांस देवाविषयी आस्था आहे, परंतू ती विज्ञानाला अनुसरुन नाही. कारण त्यांना देवाच्या नीतिमत्वाची जाणीव असल्यामुळे ते देवाच्या नीतिमत्वाला वश झाले नाहीत." —रोमकरांस पत्र १०:२३

"आम्ही सगळे अशुद्ध मनुष्यासारखे झालो आहो, आमची सर्व धर्मकृत्ये घाणेरडया वस्त्रासारखी झाली आहेत." —यशया ६४:६अ

"मी कोणा धार्मिकास म्हणालों की तूं खास वांचशील, आणि त्यानें, आपल्या धार्मीकतेवर भिस्त ठेवून दुष्कर्म केले तर त्याची सर्व धार्मिकता जमेस धरण्यांत येणार नाहीं, त्याने केलेल्या दुष्कर्मांमुळे तो मरेलच." —यहज्केल ३३:१३

"जे देहाधीन आहेत त्यांच्याने देवाला संतुष्ट करवत नाही." —रोमकरांस पत्र ७:७

"त्याजसमोर कोणी मनुष्य नियमशास्त्रांतील कर्मांनी नीतिमान ठरणार नाही." —रोमकरांस पत्र ३:२०अ

"आम्ही स्वत: कोणतीहि गोष्ट आपण होऊनच ठरविण्यापुरते समर्थ आहो असे म्हणत नाही, आमचे सामर्थ्य देवापासून आहें." —२रे करिंय ३:५

"नियम शास्त्राच्या योगे देवापुढें कोणी नीतिमान ठरत नाही हें उघड आहे; कारण 'नीतिमान विश्वासानेवांचेल" —गलती ३:११

# पाप आम्हास देवापासुन दूर करते

''हया प्रकारे एका मनुष्याच्या द्वारें पाप जगांत आलें आणि पापाच्या द्वारे मरण आलें; आणि सर्वांनी पाप केल्यावरुन सर्व मनुष्यांत मरण पसरले.'' —रोमकरांस पत्र ५:१२

''मग वासना गर्भवती होऊन पापाला जन्म देते, आणि पाप परिपक्व झाल्यावर मरणास उपजविते'' —याकोबाचे पत्र १:१५

''तर तुमचे अपराध तुम्ही व तुमचा देव यांच्यामध्यें आडभिंतीप्रमाणे झाले आहे, तुमच्या पातकांमुळे तो तुम्हास दर्शन देत नाही, तुमचे ऐकत नाही.'' —यशाया ५९:२

''ज्याच्या ठायीं अटळ नीति असते त्याला जीवन प्राप्त होते जो दुष्कर्मां मागे लागतो तो आपणावर मृत्यु आणितो''—नीतिसूत्रे ७७:७९

''देव म्हणतो, तुम्ही परमेश्वराची आज्ञा कां उल्लंघिता? अशाने तुम्हांस यश येणार नाही, तुम्ही परमेश्वरास सोडिले म्हणून त्यानेंहि तुम्हास सोडिले आहे.'' —२रा इतिहास २८:२०ब

''अवज्ञा जादुगिराच्या पातकासमान आहे, आणि हट्ट हा मूर्तिपूजा व कुलदेवतार्चन यांसारखा आहे. तूं परमेश्वराचा शब्द मोडिला आहे, म्हणून त्यानेंही तुला राजपदावरुन झुगारुन दिले आहे.'' —१ले शमुवेल १५:२३

''ते अन्य देवां कडे वळल्याने त्यांच्या हातून पातक होईल त्या समयीं मी आपले मुख त्यांपासुन लपवीन'' —अनुवाद ३१:१८

''जो जीवात्मा पाप करील तोच मरेल.'' —यहज्केल १८:२०अ

# "देवाचा कोप पापवर आहे"

"देव न्यायपर न्यायाधीश आहे, तो प्रतिदिनीं धाक दाखविणारा देव आहें"

—स्तोत्र संहिता ७:११

"परमेश्वर मंदक्रोध व महापराक्रमी आहे, तरी तो पाप्यांस शासन केल्यावांचून राहणार नाही."

—नहूम ७:३अ

"त्यामुळे देवाचा कोप आज्ञाभंगाच्या पुत्रावर होतो" —कलस्सै ३:६

"जीं मनुष्यें अनीतीने सत्य दाबून ठेवितात त्यांच्या अधर्मावर व अनीतीवर देवाचा क्रोध स्वर्गांतून प्रकट होतो"

—रोमकरांस पत्र १:१८

"सर्व अनीति, दुष्टपणा, लोभ, वाईटपणा यांनी ते भरलेले होते, हेवा, हत्या, कलह, कपट, कुबुद्धि यांनी ते पूर्ण असे होते; ते चहाड, निंदक, देवद्वेष्टे, उद्धट, गर्विष्ठ, आत्मश्लाघी, कुकर्मकल्पक, मातापितरांची अवज्ञा करणारे बुद्धिहीन वचनभंग करणारे, ममताहीन, निर्दय, असे होते, जे असे आचरण करितात ते मरणास योग्य आहेत, असा देवाचा नियम त्यांस ठऊक असतांही, ते स्वत: तीं कर्मे करितात, इतकेंच केवळ नव्हें, तर तसें आचरण करणाऱ्यांस त्यांची संमतिहि आहे."

—रोकरांस पत्र ७:२९-३२

"परंतु जे तट पाडणारे आहेत व सत्याला न मानिता अधर्माला मानितात त्यांजवर क्रोध व कोप, संकट व क्लेश हीं येतील."

—रोमकरांस पत्र २:९अ

# "न्याय पुढे आहे."

"मनुष्यास एकदाच मरणे, व त्यानंतर न्याय होणें नेमून ठेविले आहे." —इब्री ७:२७

"मग मृत झालेल्या लहानथोरांना मी राजासनापुढें उभें राहिलेले पाहिले. त्या वेळी 'पुस्तके उघडली गेलीं, तेंव्हा' दुसरे एक पुस्तक उघडले गेलें, तें जीवनाचें होतें'; आणि त्या पुस्तकांत जें लिहिले होतें त्यावरुन मृतांचा न्याय 'ज्यांच्या त्यांच्या कर्माप्रमाणे' ठरविण्यांत आला. ज्या कोणाचे नांव 'जीवनाच्या पुस्तकांत लिहिलेले सांपडले नाही,' तो अग्नीच्या सरोवरांत टाकिला गेला" —प्रकटीकरण २०:१२, १५

"सदाजीवी देवाच्या हाती सांपडणे हें भयंकर आहें" —इब्री १०:३९

"मी तुम्हांस सांगतो कीं मनुष्ये जी प्रत्येक व्यर्थ शब्द बोलतील त्याचा हिशेब त्यांस न्यायाच्या दिवशी द्यावा लागेल." —मत्तय १२:३६

"सगळया बऱ्यावाईट गुप्त गोष्टींचा न्याय करितांना देव सगळया कृत्यांची झाडाझडती घेईल." —उपदेशक १२:१४

"तसे युगाच्या समाप्तीस होईल, देवदूत येऊन धार्मिकांतून दुष्टांस वेगळे करितील, आणि त्यांस अग्नीच्या भट्टींत टाकितील, तेये रडणे व दांतखाणे चालेल"

—मत्तय १३:४७-५०

# ''आपण स्वतःला देवापासून लपवू शकत नाही''

''परमेश्वराचे नेत्र सर्वत्र आहेत, ते बरेबाईट पाहत असतात'' —नीतिसूत्रे १५:३

''हे परमेश्वरा, तू मला पाराखिले आहे, तूं मला जाणतोस. माझे बसणें व माझें उठणें तूं जाणतोस, तूं दुरुन माझें मनोगत समजतोस. तूं माझें चालणें व माझें निजणें बारकाईने पाहतोस, जाणि माझ्या एकंदर वर्तनक्रमाची माहिती तुला आहें. हे परमेश्वरा, माझ्या मुखांतून असा एकही शब्द येत नाहीं की तो तुला मुळीं ठाऊक नाहीं''

—स्तोत्र संहिता १३९:७-४

''मानवासांरखे परमेश्वराचें पाहणें नसतें, मानव बाहेरचे स्वरुप पाहतो पण परमेश्वर हृदय पाहतो''

— १ले शमुवेल १६:७ब

''ज्याने कान जड़ला तो ऐकणार नाहीं काय? ज्याने डोळा घड़ला ती पाहणार नाही काय?''

—स्तोत्र संहिता ९४:९

''कारण माझे डोळे त्यांच्या सर्व मार्गांवर आहेत, ते मला गुप्त नाहीत; त्यांचे दुष्कर्म माझ्या डोळयांपासून लपलेले नाहीं''

—यिर्मया १६:१७

''आणि त्याच्या दृष्टीला अदृश्य अशी कोणतीही सृष्ट वस्तु नाही, तर ज्याच्या बरोबर आपला संबंध आहे त्याच्या दृष्टीला सर्व उघडेंवाघडें आहें''

—इब्री ४:१३

''अधर्मी ज्यांत लपून राहतील असा काळोख, असा घोर अंधकार नाहीं.''

—ईयोब ३४:२२

# "पापापासून वळणे आवश्यक आहे"

"प्रभु परमेश्वर म्हणतो, दुष्टाच्या मरणानें मला संतोष होतो काय? त्यानें आपले मार्ग सोडून देऊन वांचावे याने मला संतोष होतो ना?"

— यहेज्केल १८:२३

"मी तुम्हास सांगतो, नव्हते, तरी पण तुम्ही पश्चाताप न केल्यास सर्व त्याप्रमाणे नाश पावाल"

—लूक १३:३

"जो आपले दोष झाकितो त्याचें बरे होत नाही, जो ते कबूल करून सोडून देतो त्याजवर दया होते"

—नीतिसूत्रे २७:१३

"आतां तरी परमेखराचें वचन ऐंका, मन:पूर्वक मजकडे वळा, उपोषण, आक्रंदन व शोक करुन वळा, आपली वस्त्रे नव्हे तर आपलें ऱ्हदय फाड़ा आणि परमेश्वर तुमचा देव याजकडे वळा"

—योएल २:१२, १३अ

"तुम्ही शब्दांनिशी परमेश्वराकडे वळा, त्याला म्हणा, आमचा सर्व अधर्म दूर कर, कृपेने आमचा स्वीकार कर"

—होशेय १४:२अ

"तो गार्णी गाऊन लोकांस म्हणतो, मीं, पाप केलें होतें, मी सरळ मार्ग सोडून वाकडया मार्गाने चालले होतो त्याचे प्रायश्चित मला मिळाले नाही. त्यानें माझा जीव रक्षिला, मला गर्तेत पडूं दिलें नाही, माझ्या जिवाला प्रकाश लाभला आहे."

—ईयोब ३३:२७, २८

"तुम्हीं परता, आपल्या सर्व पातकांपासून मागें फिरा, म्हणजे तुमचा अधर्म तुम्हास अडथळा होणार नाही"

—यहेज्केल १८:३०क

# ''पश्चातापाच्या द्वारे क्षमा प्राप्त होते''



''परमेश्वर प्राप्तीचा काळ आहें, तोंवर त्यालां शोधा, तो जवळ आहे तोंच त्याचा धावा करा, दुर्जन आपला मार्ग सोडो, अधर्मी आपल्या कल्पानांचा त्याग करो, आणि परमेश्वराकडे वळो म्हणजे तो त्याजवर दया करील, तो आमच्या देवाकडे वळो, कारण तो त्याला भरपूर क्षमा करील.'' —यशया ५५:६, ७

''परमेश्वर भग्नन्हदयी लोकांच्या सन्निध असतो, अनुतप्त मनाच्या लोकांस तो उद्धरितो''

—स्तोत्रसंहिता ३४:१८

''ते सर्व आपआपल्या कुमार्गापासून वळतील आणि मी त्यांच्या दुष्कर्माची व त्यांच्या पापाची त्यांस क्षमा करीन.'' —यिर्मया ३६:३ब

''मी आपले पाप तुजजवळ कबूल केले. आपला अधर्म मीं लपवून ठेविला नाही, मीं आपले अपराध परमेश्वराजवळ कबूल करीन असें मी म्हणालो, तेव्हा तूं मला माझ्या पापदोषाची क्षमा केली.'' —स्तोत्रसंहिता ३२:५

''जर आपण खत:ची पापें पदरी घेतो, तर तो विश्वासू व न्यायी आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करील, व आपल्याला सर्व अधर्मापासून शुद्ध करील.'' —१ले योहान १:९

''यास्तव तुमची पापें पुसून टाकिली जावी म्हणून पश्चाताप करा व मागें वळा.''

—प्रेषितांचे कृत्ये ३:१९अ

''परमेश्वर देव काय बोलेल तें मी ऐकून घेईन, कारण तो आपल्या लोकांशी व आपल्या भक्तांशी क्षेमकुशलाचें भाषण करील. मात्र त्यांनी मूर्खपणाकडे पुन: वळूं नये.'' —स्तोत्र संहिता ८५:८

''पश्चाताप करण्याचा अर्थ आहे पापांपासून वळणे, त्याच प्रमाणे त्या पापांची कबूली देवाजवळ करणे.

# "देवा बरोबर आमचा समेट होण्यासाठी बलीदानाची आवश्यकता होती"

(पृष्ठ १४ सोबत तुलना करा)

"यज्ञपशूच्या मस्तकावर त्यानें हात ठेवावा म्हणजे तो पशु त्याच्या प्रायश्चित्तादाखल मान्य होईल. कारण शरीरचें जीवन रक्तांत असतें, आणि तुमच्या जिवाबद्दल प्रायश्चित व्हावें म्हणून तें तुम्हांस वेदीवर दिले आहे, कारण जिवाबद्दल प्रायश्चीत रक्तानेंच होतें."

—लेवीय ७:४, १७:११

"नियमशास्त्राप्रमाणे रक्तानें सर्व शुद्ध होतात, आणि रक्तपाता वांचून पापमोचन होत नाही, असे म्हटलें असतां चालेल." —इब्री ९:२२

"कोकरू ह्यावयाचे तें निर्दोष असून तो एक वर्षाचा नर असावा, आणि ज्या घरांत तुम्ही असणार त्यावर तें रक्त तुम्हां प्रीत्यर्थ खूण होईल. मी जेव्हां रक्त पाहीन तेव्हां तुम्हांस ओलांडून जाईन, मिसर देशच्या लोकांस मी मारीन तेव्हां तुम्हांवर अनर्थ येणार नाहीं, तुमचा नाश व्हावयाचा नाहीं."

—निर्गम १२:५अ१३

"त्यानें म्हटलें, पाहा, विस्तव व लाकडें आहेत पण होमबलीसाठी कोकरुं कोठें आहें? त्यास आब्राहाम म्हणाला, बाळा, देव स्वत: होमबलीसाठीं कोकरुं पाहून देईल; तेंव्हा आब्राहामाने डोळे वर करुन पाहिले तों आपल्यामागें झुडपांत शिंगे गुंतलिला एक एडका त्यास दिसला, मग आब्राहामाने तो घेऊन आपल्या पुत्राच्या ऐवजी अर्पण केला."

—उत्पत्ती २२:७ब-४अ, १३

# "येशू, देवाने पुरवुन दिलेला कोकरां आहे."

"दुसऱ्या दिवशी त्यानें येशूला आपणा कडें येतांना पाहून म्हटले, हा पाहा, जगाचे पाप हरण करणारा, देवाचा कोकरा!" —योहान १:२९

"आम्हा सर्वांचे पाप परमेश्वराने त्याजवर लादिले, त्याचे हालहाल केले तरी ते त्याने सीशिले आपले तोंडसुद्धा उघडिले नाहीं, वधावयास नेत असलेल्या कोकराप्रमाणे, लोकर कातरणाऱ्यांपुढे गप्प राहणाऱ्या मेंढराप्रमाणें, तो गप्प राहीला, त्याने आपले तोंड उधाडिले नाहीं."

—यशया ५३:६ब७

"आणि बकरें व गोऱ्हे यांचे रक्त नव्हे, तर आपले रक्त घेऊन एकदाच परमपवित्रस्थानांत गेला, आणि त्याने सार्वकालीक मुक्ति मिळविली. पण तो युगांच्या समाप्तीस स्वत:च्या यज्ञानें पापे नाहीतशी करण्यासाठी एकदाच प्रकट झाला आहे. त्या अर्थी ख्रिस्त 'बहुतांची पापें स्वत:वर घेण्यास' एकदाच अर्पिला गेला."

—इब्री ९:१२, २६ब, २७अ

"वाडवडील माणसांच्या परंपरेनें चालत आलेल्या आपल्या व्यर्थ वागणुकीपासून सोने, रुपे अशा नाशवंत वस्तूंनी नव्हे, तर निष्कलंक व निर्दोष कोकरा, असा जो ख्रिस्त, त्याच्या मूल्यवान रक्तानें तुम्ही मुक्त झालां आहां हे ध्यानांत ठेवा."

—१ले पत्रे १८:१९

"तर सार्वकालिक आत्म्याच्या योगें ज्यानें निष्कलंक अशा स्वत:स देवाला अर्पण केलें त्या ख्रिस्ताचें रक्त तुमचा विवेकभाव जीवंत देवाच्या सेवेसाठीं निर्जीव कर्मांपासून किती विशेषेंकरुन शुद्ध करील?" —इब्री ९:१४

# "मुक्ति केवळ देवाच्या कृपेने"

"ते ख्रिस्त येशूनें खंडणी भरुन प्राप्त केलेल्या मुक्तीच्या द्वारे देवाच्या कृपेनें मोबदल्यावाचून नीतिमान ठरतात. त्याच्या रक्तानें विश्वासाच्या द्वारें प्रायश्चीत होण्यास देवाने त्याला पुढे ठेविलें."

—रोमकरांस पत्र ३:२४, २५अ

"परंतु देव आपल्यावरच्या स्वप्रेमाचे प्रमाण हें देतो कीं आपण पापी असतां ख्रिस्त आपणांसाठीं मरण पावला. तर आपण जे आतां त्याच्या रक्ताने नीतिमान ठरलो आहों ते आपण विशेषेकरुन त्याच्या द्वारें देवाच्या क्रोधापासून तरले जाऊं." —रोमकरांस पत्र ५:८,९

"तरी मनुष्य नियमशास्त्रांतील कर्मानी नीतिमान ठरत नाही, तर येशू ख्रिस्तावरील विश्वासाच्या द्वारें ठरतो" —गलती २:१५अ

"तुमचे तारण कृपेनेंच विश्वासाच्या द्वारें झालें आहे, आणि हें तुमच्या हातून झले नाहीं, तर हें देवाचें दान आहे. कोणीं आढयता बाळगूं नये म्हणून कर्मे केल्याने हें झालें नाहीं."

—इफिसकराल पत्र २:८-९

"त्याज विषयी सर्व संदेष्टे साक्ष देतात कीं त्याजवर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नामानें पापांपासून मुक्ति मिळेल."

—प्रेषितांची कृत्ये १०:४३

"आणि तारण दुसऱ्या कोणाकडून नाही, जेणेंकरुन आपलें तारण व्हावयाचें असें दुसरें नाव आकाशाखाली मनुष्यांमध्यें दिलेलें नाहीं."

"त्याच्या कृपेच्या विपुलतेप्रमाणे त्या प्रियकरांत त्याच्या द्वारें आपल्याला मुक्ती म्हणजे आपल्या अपराधांची क्षमा मिळाली आहें."—इफिस १:७

# येशूच्या जन्माची घोषणा



''देवाने गालीलातील नासरेथ नामें नगरास एका कुमारीकडे गब्रीएल देवदूताला पाठविले. ती दाविदाच्या घराण्यांतील योसेफ नामें पुरुषाला वाग्दत्त होती, त्या कुमारीचे नांव मरीया होते. तेव्हां देवदूत आंत तिजकडे येऊन म्हणाला, हे कृपा पावलिल्यो, कल्याण, प्रभु तुजबरोबर असो, (स्त्रियांमध्ये तूं धन्य आहेस) ती त्या बोलण्यानें फार घाबरली, आणि हे अभिवंदन काय असेल असा विचार करुं लागली. देवदूतानें तिला म्हटले, मरीये, भिऊं नको, कारण देवाची कृपा तुजावर झाली आहे, पाहा तूं गरोदर होशील व पुत्र प्रसवशील, त्यांचें नांव येशू ठेव. तो थोर होईल व त्याला परात्पराचां पुत्र म्हणतील, आणि प्रभु देव त्याला त्याचा बाप 'दावीद याचें राजासन' देईल. त्याच्या राज्याचा अन्त होणार नाही. मरियेने देवदूताला म्हटले, हे कसे होईल? कारण मला पुरुष ठाऊक नाही. देवदूतानें उत्तर दिलें, पवित्र आत्मा तुजवर येईल, आणि परात्पराची शक्ती तुजवर छाया करील, या करितां जो जन्मेल त्याला पवित्र, देवाचा पुत्र, असें म्हणतील. पाहा, तुझी नातलग अलीशिबा इलाहि म्हातारपणीं पुत्रगर्भ राहिला आहे, आणि जिला वांझ म्हणत तिला हा सहावा महिना आहे. 'देवाचें कोणतेंही वचन असमर्थ होईल असें नाहीं.' तेंव्हा मरीया म्हणाली, पाहा, मी प्रभूची दासी, मला तुझ्या वचनाप्रमाणें होवो. मग देवदूत तिजपासून निघून गेला.''

—लूक १:२६ब-३८

''केवळ दोनच पुरुष आले ते म्हणजे आदाम व ख्रिस्त. आदामाच्या द्वारे पाप जगात आले, परन्तू येशू ने पापावर विजय मिळविला.

# येशु खरा कोण आहे

''येशू ख्रिस्त देवाच्या स्वरुपाचा असूनही देवासमान असणे हा लाभ असा त्यानें मानिला नाहीं, तर त्यानें स्वतःला रिक्त केले, आणि मनुष्य-प्रकृतीचे असें प्रकट होऊन त्याने मरण, आणि तेंहि वधस्तंबावरचे मरण, सोशिले, एथपर्यंत आज्ञापालन करुन त्यानें स्वतःला लीन केले.''
—फिलीप्पे २:५-८

''मी आणि पिता एक आहों, तर ज्याला पित्यानें पवित्र कार्यास्तव नेमून जगांत पाठविले त्या मला, मी देवाचा पुत्र आहें असें म्हटल्यावरुन, तूं दुर्भाषण करितोस असें तुम्ही म्हणता काय?''
—योहान७०:३०, ३६.

''येशू ख्रिस्त जो सार्वकालीक शब्द आहे, तो नेहमीच अस्तीत्वात होता, चमत्काराच्या द्वारे देवाने त्याला मरीयेच्या गर्भाशयात गर्भधारीत केले. शारीरिक रित्या तो मनुष्याचा पुत्र म्हणुन ओळखला जातो. अणि आत्मिक दृष्टिने तो देवाचा पुत्र म्हणुन ओळखला जातो. पवित्र शास्त्र ''पुत्र'' या शब्दाचा उपयोग देव व देवाचा शब्द जो येशू ख्रिस्त यां मधील संबंध स्पष्ट करण्यासाठी करतें.

''यास्तव तो जगांत येतेवेळेस म्हणाला, यज्ञपशु व अन्नार्पण यांची तुला इच्छा नाहीं, तूं माझ्यासाठी शरीर तयार केले आहें.'' —इब्री १०:५

''पवित्रता संपन्न आत्म्याच्या योगें पराक्रमानें देवाचा पुत्र ठरलेला, असा आपला प्रभु येशू ख्रिस्त.''
—रोमकरांस पत्र १:४

''थोमाने त्याला म्हटले, माझा प्रभु व माझा देव.''
—योहान २०:२८

# "येशू खरा कोण आहें."

"सुभक्तीचें गूज निर्विवाद मोठें आहें, तो देहाने प्रगट झाला."
–१ ले निमथी ३:१६ अ

"कारण ख्रिस्ताच्या ठायींच देवपणाची सर्व पुर्णता मूर्तिमान वसते." –कलस्सै २:९

"कारण आम्हांसाठी बाळ जन्मला आहे, आम्हास पुत्र दिला आहें, त्याच्या खांदद्यांवर सत्ता राहील, त्याला अद्‌भूत मंत्री, समर्थ देव, सनातन पिता, शांतीचा अधिपति म्हणतील."
–यशया ९:६

"येशूने त्यांस म्हटलें, मी तुम्हास खचीत खचीत सांगतों, आब्राहाम झाला त्या पूर्वी मी आहें." –योहान ८:५८

"त्याच्या ठायी जीवन होतें व ते जीवन मनुष्यांचा प्रकाश होतें, जो खरा प्रकाश प्रत्येक मनुष्याला प्रकाशित करितो तो जगांत येणार होता. तो–होता, व जग त्याच्या व्दारें झालें, तरी जगानें त्याला ओळाखेले नाही."
–योहान १:४, ९–१०

"कारण एकच देव आहे, आणि देव व मनुष्यें यांमधील ख्रिस्त येशू हा मनुष्य एकच मध्यस्थ आहे त्याने सर्वासाठी मुक्तीचे मोल म्हणून स्वात:ला दिले." –१ले तिमयी २:५, ६ अ

"त्या पुत्राच्या ठायी आपल्याला मुक्ती म्हाणजे आपल्या पापांची क्षमा प्राप्त झाली आहें. तो अदृष्य देवाची प्रतिमा आहें."
–कलस्सै १:१४, १५ अ

# पवित्र शास्त्र देवाचे वचन आहें.

''कारण धार्मीकतेचा मार्ग समजून आल्यानंतर आपणांस दिलेल्या पवित्र आज्ञेपासून परावृत्त होणें या पेक्षां तो न समजणे हें त्यांस बरें होतें.''

-२रे पेत्र १:२१

''आपले जे पवित्र संदेष्टे आरंभापासून होते त्यांच्या मुखाने त्यानें सांगितल्या प्रमाणे...त्यांच्या लोकास त्याच्या पापक्षनें तारणाचे ज्ञान द्यावें.''

-लूक १:७०, ७७

''परमेश्वराचा आत्मा माझ्या द्वारे म्हणालां, त्याचें वचन माझ्या जिव्हेवर आलें.''

-२ रे शमुवेल २३:२

''त्या गोष्टी मी तुला आज बजावून सांगत आहे त्या तुझ्या ऱ्हदयांत बिंबीव.''

-अनुवाद ६:६

''प्रत्येक ईश्वरप्रेरित शास्त्रलेख, सब्दोध, दोष दाखपिणे, सुधारणूक, नीतिशिक्षण यांकरितां उपयोगी आहें.'' -२ रे तिमयी ३:१६

''जे कांही शास्त्रांत पूर्वी लिहिले तें सर्व आपणासं शिक्षण मिळण्याकरितां लिहिलें, या साठीं कीं शास्त्रापासून मिळणाच्या सहनशीलतेच्या व समाधानाच्या योगे आपल्याला आशा प्राप्त व्हावी.'' -रोमकरांस पत्र १५:४

''तुम्हांस शास्त्र व देवाचें सामर्थ्य न कळल्या मुळें तुम्ही भ्रमांत पडलां आहां.''

-मत्तय २२:२९ ब

''कारण तूं आपल्या संपूर्ण नामाहून आपल्या वचनाची थोरवी वाढविली आहें.''

-स्त्रोत्रसंहिता १३८:2 (ब)

# येशू देवाचा शब्द आहें.

''रक्तात बुचकळलेलें वस्त्र त्यानें अंगावर घेतले होतें, आणि देवाचा शब्द हें नांव त्याला देण्यांत आलें होतें.'' -प्रकटीकरण १९:१३

''प्रारंभी शब्द होता, शब्द देवासह होता, आणि शब्द देव होता. शब्द देही झाला, आणि कृपा व सत्य यांनी परिपूर्ण असून त्याने आम्हामध्ये वस्ती केली.'' -योहान १:१, १४ अ

### *''येशू देवाला प्रगट करतो''*

''देवाला कोणीं कधी पाहिले नाहीं, जो एकुलता एक पुत्र पित्याच्या उराशी असतो त्यानें त्याला प्रगट केलें.'' -योहान १:१८

''अंधकारातून उजेड प्रकाशित होईल जो देव बोलला तो, येशू ख्रिस्ताच्या मुखावरील देवाच्या तेजाचे ज्ञान प्रकाशित करावें म्हणून, आमच्या अन्त:करणांत प्रकाशला आहे.''

-२ रे करिंथ ४:६

### *''परमेश्वर येशू च्या द्वारे बोलतो''*

''देव प्राचीन काळी अंशाअंशानी व प्रकारा प्रकारांनी आपल्या पूर्वजांशी संदेष्टयाच्या द्वारें बोलला, तो या काळाच्या शेपटी आपल्याशीं पुत्राच्या द्वारें बोलला आहें, त्याने त्याला सर्वांचा वारीस करुन ठेविले आहे. द्वारें आणि त्याच्या त्याने विश्व उत्पन्न केलें.'' -इब्री १:१, २

''माझ्यावर कोणाचें प्रेम नसल्यास तो माझीं वचनें पाळीत नाहीं; जे वचन तुम्ही ऐकत्तां तें माझें नव्हे, तर ज्या पित्यानें मला पाठविलें त्याचें आहे.'' -योहान १४:२४

# *''पवित्र शास्त्र आत्म्या करिता भोजन आहें.''*

''माझ्या स्वत:च्या मनोरथापलीकडे मीं त्याच्या तोंडची वचनें जतन करुन ठेविली आहेत.''

-इयोब २३:१२ ब

''मनुष्य केवळ भाकरीने नाहीं, तर देवाच्या मुखांतून निघणाऱ्या प्रत्येक वचनाने वांचेल.''

-मत्तय ४:४ ब

## *''येशु स्वर्गातून अलेल्रे भाकर आहे''*

''स्वर्गातून उतरेलेली जीवंत भाकर मीं आहें, या भाकरीतून जो कोणी खाईल तो सर्वकाळ वाचेंल, जी भाकर मी देईन ती जगाच्या जीवनासाठी माझाया देह अशी आहे. मी जीवनाची भाकर आहे.''

-योहान ६:५१, ४८

## *पवित्र शास्त्र आमच्या मार्गावरील प्रकाश आहें.*

''तुझें वचन माझ्या पावलांकरितां दिवा व माझ्या मार्गावर प्रकाश आहें.''

-स्तोत्र ११९:१०५

''तुझ्या वचनांच्या उलगडयानें प्रकाश प्राप्त होतो, त्यानें भोळ्यांस ज्ञान प्राप्त होतें.''

-स्तोत्र ११९:१३०

## *''येशू जगाचा प्रकाश आहें''*

''त्याच्या ठायीं जीवन होतें, व तें जीवन मनुष्यांचा प्रकाश होतें.'' ''जितक्यांनी त्याचां स्विकार केला तित्तक्यांस, म्हणजे त्याच्या नामावर विश्वास ठेवणाऱ्यांस, त्यानें देवाची मुलें होण्याचा अधिकार दिला.''

-योहान १:१२

## पवित्र शास्त्र फलदायी जीवन देते

''तर परमेश्वराच्या शास्त्रात रमतो, त्याच्या शास्त्राचे अहोरात्र मनन करितो, जे झाड पाण्याच्या प्रवाहाजवळ लाविलेले असतें, जें आपल्या हंगामी फळ देतें, ज्याची पाने कोमत नाहींत, अशा झाडासारका तो आम्हें, आणि जें कांही तो हाती धेतो तें सिद्धीस जातें''

–स्त्रोत्रसंहिता १:२, ३

## येशू फलदायी जीवन देतो

''तुम्ही मजमध्ये राहा, आणि मी तुम्हांमध्ये राहतो जसें फाटा वेलांत राहिल्यावाचून त्याच्याने आपल्या आपण फळ देववत नाहीं तसें मजमध्ये राहिल्यावांचून तुम्हांलाही देतां येणार नाहीं. मी वेल अहें तुम्ही फाटे आहां, जो मजमध्ये राहतो आणि मी त्याजमध्ये राहतों तो पुष्कळ फळ देतों; कारण मजपासून वेगळे असल्यास तुम्हाला कांही करता येत नाहीं.''

–योहान १५:४, ५

## पवित्र शास्त्र येशूला विदित करते

''तुम्ही शास्त्रलेख शोधून पाहतां; कारण त्यांत सार्वकालिक जीवन आपणांस प्राप्त होईल असें तुम्ही समजतां; मजविषयी साक्ष देणारे अहित. तुम्ही मोशाचा विश्वास धरिला असता तर माझाया विश्वास धरिला असता, कारण मजविषयी त्यानि लिहीलें''

–योहान ५:३९,४६

''मग त्याने मोशे व सर्व संदेष्टें यांजपासून आरंभ करुन सगळ्या शास्त्रांतील आपणविषयींच्या गोष्टींचा अर्थ त्यांस सांगितला.''

–लूक २४:२७

# "देवाचा सार्वकालिक शब्द कधी बदलत नाही"

"हे परमेश्वरा तुझे वचन स्वर्गात सर्वकाळ स्थिर आहें." -स्तोत्रसंहिता ११९:८९

"तुझे एकंदर वचन सत्य अहे, तुझे सर्व निर्णय सनातन आहेत." -स्तोत्रसंहिता ११९:१६०

"गवत सुकतें, फुल कोमेजतें, पण आमच्या देवाचें वचन सर्वकाळ कायम राहतें." -यशया ४०:८

"आकाश व पृथ्वी नाहींतशी होतपर्यंत सर्व गोष्टी पूर्ण झाल्यावाचून नियम शास्त्राची एक मात्रा किंवा एक बिन्दू नाहींसा होणार नाहीं."

-मत्तय ५:१८ ब

"शास्त्रलेखाचा भंग होत नाही."

-योहान १०:३५ ब

"मी तुम्हास सांगत आहें त्या गोष्टी लक्षपूर्वक पाळा; त्यांत अधिकउणें कांही करु नका."

-अनुवाद १२:३२

"त्याच्या वचनांत तूं कांही भर घालूं नको, घालिशील तर तो तुझा दोष उघड करील आणि तूम लबाड ठरशील." -नीतिसूत्रे ३०:६

"आणि जो कोणी या संदेशाच्या पुस्तकांतील वचनांतून कांही 'काढून टाकील' त्याचा वांटा या पुस्तकांत वर्णिलेल्या जीवनी झाडांतून व पवित्र नगरांतून देव काढून टाकील."

-प्रकटीकरण २२:१९ अ

"वचन तुच्छ मानणारा स्वतांवर अनर्थ आणितो." -नीतिसूत्रे १३:१३ अ

"मी आपला जीव परत घेण्याकरितां देतों, म्हणून पिता मजवर प्रीति करितो तो कोणि मजपासून घेत नाहीं, तर मी होऊनच तो देतो, मला तो देण्याचा अधिकार आहे व तो परत घेण्याचाहि अधिकार."

-योहान १०:१७, १८अ

"येशूने उत्तर दिलें, तुला वरुन अधिकार देण्यांत आला नसला तर मजवर तों मुळींच चालला नसता." -योहान १९:११ अ

"मला आपल्या पित्याजवळ मागतां येत नाहीं, आणि आतां तो मला देवदूतांच्या बारा सैन्योपेक्षा अधिक पाठवून देणार नाहीं, असें तुला वाटतें काय? एरवीं, असें झालें पाहिजे हें म्हणणारे शास्त्रलेख कसें पूर्ण व्हावें?"-मत्तय २६:५३,५४

"परन्तु आपल्या ख्रिस्तानें दु:ख सहन करावें म्हणून देवाने सर्व संदेष्टयांच्या मुखाने पूर्वी सांगितले होतें तें त्यानें त्या प्रमाणे पूर्ण केलें."

-प्रेषितांत्ची कृत्ये ३:१८

"तो देवाच्या संकल्पाप्रमाणे व पूर्वज्ञाना प्रमाणे तुमच्या स्वाधीन झाल्यावर तुम्ही त्याला धरून अधर्म्यांच्या हातांनी वधस्तंभावर खिळून मारिले."

-प्रेषितांची कृत्ये. २:२३

"त्याला ठेचावें असें परमेश्वराच्या मर्जीस आलें, त्याच्या जिवाचें दोषार्पण झाल्यावर तो संतति पाहोल." -यशया ५३:१० अ

"ख्रिस्ताने हीं दु:खे सोसावी आणि आपल्या गौखांत जावें, याचें अगत्य नव्हते काय?"

-लूक २४:२६

# "साक्षीदार येशूच्या मृत्युची वार्ता देतात"

"त्यांनी त्याच्याबरोबर दोन लुटारु, एक उजवीकडे व एक डावीकडे असे वधस्तंभावर खिळिले, आणि अपराध्यांत तो गणलेला होता, हा शास्त्रलेख पूर्ण झाला."

-मार्क १५:२७-२८

"मग शिष्यांनी येऊन त्याजबरोबर वधस्तंभावर खिळलेल्या पहिल्याचे व दुसऱ्याचे पाय मोडिले, परंतु येशूकडे येऊन तो मरून गेला आहे असे पाहून त्यांनी त्याचे पाय मोडिले नाहींत. तरी शिष्यांतील एकानें त्याच्या कुशींत भाला बोसकिला, तों रक्त व पाणी निघाले ज्याने हें पाहिले त्यानें साक्ष दिली आहे व त्याची साक्ष खरी आहे, आपण खरें बोलतों हें त्याला ठाऊक आहे, यासाठी कीं तुम्हींही विश्वास धरावा, त्याचे हाड मोडणार नाही' हा शास्त्रलेख पूर्ण व्हावाा म्हणून या गोष्टी घडल्या. शिवाय वुसऱ्याही शास्त्रलेखांत असे म्हटले आहे की 'ज्याला त्यांनी विंधिले त्याजकडे ते पाहिले."

-योहान १९:३२-३७

"मग दोन प्रहरापासून तिसऱ्या प्रहरापर्यंत सर्व देशावर अंधार पडला, मग येशूने पुन: मोठयाने ओरडून प्राण सोडिला तेंव्हां पहा, पवित्रस्यानांतील पडदा वरपासून खालपर्यंत फाटून दुभागला, भूमि कांपली, खडक फुटले, जमादार व त्याच्या बरोबर येशूची राखण करणारे हें, भूमिकंप व घडलेल्या गोष्टी पाहून, अत्यन्त भयभीत झाले, व खरोखर हा देवाचा पुत्र होता, असे म्हणाले."

-मत्ती २७:४६, ५०-५१, ५४

# ''येशूने मृत्युवर विजय मिळविला''



''त्याला देवानें मरणाच्या वेदनांपासून सोडवून उठविले, कारण त्यानें मरणाच्या स्वाधीन राहावे हें अशक्य होतें त्या येशूला देवाने उठविले याविषयी आम्ही सर्व साक्षी आहों.''

–प्रेषितांची कृत्ये २:२४, ३२

''ज्या अर्थी 'मुले' एकाच रक्तमांसाची होती त्या अर्थी तो ही त्यांच्यासारखा रक्तमांसाचा झाला, या साठी कीं मरणावर धनीपणा करणारा म्हणजे सैतान, याला आपल्या मरणानें नाहीसे करावें आणि जे मरणाच्या भयानें आयुष्याभर दासपणाने बांधलेले त्या सर्वांस मोकळे करावें.''

–इब्री २:१४, १५

''अरे मरणा, तुझा विजय कोठें? अरे मरणा, तुझी नांगी कोठें? तरी जो देव आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या व्दारें आपणांला जय देतो त्याची स्तुति असो.'' –१ ले करिंय १५:५५, ५७

''मी मेलों होतों तरी पहा, युगानुयुग जविंत आहें, आणि मरणाच्या व अधोलोकच्या किल्ल्या मजजवळ आहेत.'' –प्रगटीकरण १:१८

''तर देवाच्या सामर्थ्याच्या परिमाणानें सुवेतसाठी माझ्या बरोबर दु:ख सोसोवर्ती, ती आतां आपला तारणारा ख्रिस्त येशू याच्या प्रकट होण्यानें दृश्यमान झाली आहें, त्यानें मरण नाहींसे केले, आणि सुवार्तेच्या व्दारा जीवन व अविनाशिता हीं प्रकाशित केली आहेत.'' –२ तिमयी १:८ ब, १०

''त्याजवर पुढें मरणाची सत्ता नाहीं.''

–रोम ६:९ ब

# येशूचे आम्ही काय करावे

''पाहा, मी दाराजवळ उभा आहें व ठोकीत आहें, जर कोणी माझी वाणी ऐकून दार उघडील, तर मी त्याच्याजवळ आंत जाईन व त्याजबरोबर जेवीन, आणि तो मजबरोबर जेवील.''

–प्रकटीकरण ३:२०

''पण कर्म न करितां अधर्म्याला नीतिमान ठरविणाऱ्यावर विश्वास ठेवणाऱ्याचा विश्वास नीतिमत्व असा मोजण्यांत येतो.'' –रोम ४:५

''पवित्र आत्मा घ्या, मागा म्हणजे तुम्हास मिळेल यासाठीं की तुमचा आनंद परिपूर्ण व्हावा.''

–योहान २०:२२ ब १६:२४ ब

''जर तूं आपल्या मुखानें येशू प्रभु आहे असें स्वीकारिशील, अंत:करणात विश्वास धरशील तर तुला तारणप्राप्ती होईल.'' –रोम १०:९

''जो माझ्या पेक्षां बापावर किंवा आईवर अधिक प्रीति करितो तो मला योग्य नाहीं, मग येशूनें आपल्या शिष्यांस म्हटलें, माझ्या मागें येण्याचें कोणाच्या मनांत असेल तर त्यानें आत्म निग्रह करावा व आपला वधस्तंभ उचलून घेऊन मला अनुसरावें. कारण जो कोणी आपला जीव वांचविण्यास पाहील तो त्याला मुकेल, आणी जो कोणी मजकरितां आपल्या जीवाला मुकेल त्याला तो मिळेल.''–मत्तय २०:३७ अ१६:२४,२५

''आणि तुम्हीं जर ख्रिस्ताचे आहां तर आब्राहामाचें संतान आणि वचनव्दारा वारीस आहा'' –गलत्ती ३:२९

''ते म्हणाले, प्रभु येशूवर विश्वास ठेव, म्हणजे तुझें व तुझ्या घराण्यांचे तारण होईल.''

–प्रेषित १६:३१

# येशू व्दारा नविन जीवन प्राप्ती होते



"ती साक्ष हीच आहे कीं देवानें आपल्याला सार्वकालिक जीवन दिलें आणि हें जीवन त्याच्या पुत्रामध्ये आहें. ज्याला तो पुत्र आहे त्याला जीवन आहे, ज्याला देवाचा पुत्र नाहीं त्याला जीवन नाहीं." –१ ले योहान ५:११,१२

"तरी देव दयाघन आहे म्हणून आपण आपल्या अपराधांमुळे मृत झालों असतांही त्यानें आपल्यावरील स्वत:च्या परमप्रेमामुळे ख्रिस्ताबरोबर आपणांला जीवंत केलें."

"मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभाला खिळिलेला आहे, आणि मी जगतों असें नाहीं, तर ख्रिस्त माझ्या ठायी जगतो, आणि आतां देहामध्ये जें माझें जीवित आहे तें विश्वासानें आहे, ज्या देवाच्या पुत्रानें मजवर प्रीति केली व स्वत:ला मजकरीतां दिलें त्याजवरील विश्वासनें तें आहें." –गलती २:२०

"जो जीवनी आत्म्याचा नियम त्यानें मला ख्रिस्त येशूमध्यें पाप व मरण यांच्या नियमापासून मुक्त केलें." –रोम ८:२

"जर कोणी ख्रिस्ताच्या ठायीं आहे तर तो नवी उत्पती आहें, जुनें तें होऊन गेलें, पाहा, तें नवें झाले आहें." –२रे करिंथ ५:१७

"निष्कपट बंधुप्रीति उत्पन्न होईल असे आपले जीव सत्यपालनानें शुद्ध करुन एकमेकांवर मनापासून निष्टेने प्रीति करा."

–१ ले पेत्र १:२३

"नूतन जन्मलेल्या बालकांसारखे तारणासाठीं वृद्धि होण्यास अध्यात्मिक निऱ्या दुधाची इच्छा धरा." –१ ले पेत्र २:२

# "परमेश्वर त्याच्या लोकांचा पिता आहें."

"पितृहीनांचा पिता, विधवांचा कैवारी असा देव आपल्या पवित्र निवासस्थानीं आहें."

-स्तोत्रसंहिता ६८:५

"तर आतां, हे परमेश्वरा, तूं आमचा पिता आहेस; आम्हीं माती आहों, तूं आमचा कुंभार आहेस, आम्ही सर्व तुझ्या हातची कृती आहों हे परमेश्वरा तूं आमचा पिता आहेस आमचा त्राता, हें तुझें प्राचीन काळापासून नाम आहें."

-यशया ६३:१७ ब

"तुझ्या पवित्र लोकांनी केवळ थोडा काळ वचन भागिलें, आमच्या शत्रूंनी तुझें पवित्र स्थान तुडवून टाकिले आहें." -यशया ६३:१६ ब

"तथापि इस्त्राएलाची संतती संमुद्राच्या वाळूसारखी संख्येने अपरिमति व अगण्य होईल आणि असे घडून येईल कीं तुम्हीं माझे लोक नव्हां असें जेसे त्यांस म्हणत, तेयें तुम्ही जीवंत देवाचे पुत्र आहां, असे त्यांस म्हणतील."

-होशेय १:१०

"यास्तव तुम्ही वाईट असतां आपल्या मुलांस चांगल्या देणग्या देण्याचें समजतां, तर तुमच्या स्वर्गातील पित्या जवळ जे मागतात त्यांस तो किती विशेवेंकरून चांगल्या देणग्या देईल. यास्तव या प्रकारे प्रर्थना करा, हे आमच्या स्वर्गातील पित्या, तुझें नाम पवित्र मानिले जावों."

-मत्तय ७:११, ६:९

"मी तुम्हासं स्विकार करीन, आणि मी तुम्हासं पिता असा होईन, आणि तुम्ही मला पुत्र व कन्या अशी व्हाल." -२ रें करिंथ ६:१७ ब, १८

"जितक्यांस देवाचा आत्मा चालवितो ते देवपुत्र आहेत." -रोम ८:१४

# "येशू द्वारे आम्हीं परमेश्वराला पिता म्हणून ओळखातों"

"येशूने त्याला, म्हटलें, मार्ग, सत्य, व जीवन मीच आहें, माझ्या द्वारें आल्यांवाचून पित्याजवळ कोणी जात नाहीं, मी कोण आहें हें तुम्हीं ओळखले असतें तर माझ्या पित्यालाही ओळखलें असतें, एथुन पुढें तुम्हीं त्याला ओळखतां व तुम्हीं त्याला पाहिलेंहि आहें. कोणाचे मजवर प्रेम असेल तर तो माझें वचन पाळील आणि माझा पिता त्याजवर प्रेम करील, आणि आम्ही त्याजकडे येऊन त्याजबरोबर वस्ती करूं"

–योहान १४:६, ७, २३ ब

"जितक्यांनी त्याचा स्वीकार केला तितक्यांस, म्हणजे त्याच्या नामावर विश्वास ठेवणाऱ्यांस त्यानें देवाची मुलें होण्याचा अधिकार दिला."

–योहान १:१२

"जर कोणी पाप केलेचं, तर धार्मिक असा जो येशू ख्रिस्त तो पित्याजवळ आपला कैवारी आहें."

–१ ले २:१ ब

"त्याच्या द्वारें एका आत्म्यांत आपणां उभयताच्चा पित्यजवळ प्रवेश होतें."

–इफिस २:१८

# येशूच्या द्वारे शान्ती प्रेम व आनन्द प्राप्त होते

"जो प्रिती करीत नाहीं तो देवाला ओळखीत नाहीं. कारण देव प्रेमस्वरुप आहें. जो प्रीतिमध्ये राहतो तो देवामध्यें राहतो, व देव त्या मध्ये राहतो." –१ले योहान ४:८, १६ब

"आणि तुम्हीं एकमेकाबरोबर उपकारकि व कनवाळू व्हा, जशी देवानें ख्रिस्तामध्ये तुम्हाला क्षमा केली आहे तशी तुम्हीही एकमेकाला क्षमा करा." –इफिस ४:३२

"तुमची एकमेकांवर प्रीति असली म्हणजे त्यावरुन सर्व ओळखतील कीं तुम्ही माझे शिष्य आहां." –योहान १३:३५

"आत्म्याच्या प्रभावाने होणारी फलप्राप्ती प्रीति आनन्द शान्ती..." –गलती ५:२२अ

"तरी मी परमेश्वराच्या ठायीं हर्ष पावेन मला तारण देणाऱ्या देवाविषयी मी उल्लास करीन." –हबक्कूक ३:१८

"जीवनाचा मार्ग तूं मला दाखविशील तुझ्या, सान्निध्यांन पूर्णानन्द आहें, तुझ्या उजव्या हातांत सौख्यें सदोदीत आहेत." –स्त्रोत्रसंहिता १६:११

"यास्तव आपण विश्वासानें नीतिमान ठरविलेले आहों म्हणून आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या द्वारें आपणांस देवाबरोबर असलेल्या शांतीचा लाभ घडो." –रोम ५:१

"मी तुम्हास शांती देऊन ठेवितों, आपली शांति तुम्हांस देतों, जसें जग देतें तसें मी तुम्हांस देत नाही. तुमचे अंतःकरण अस्वस्थ अथवा भयभीत होऊं नयें" –योहान १४:२७

"सर्व बुद्धी सामर्थ्याच्या पलीकडे असलेली देवाची शांति तुमचीं अंतःकरणे व तुमचे विचार ख्रिस्त येशू मध्यें राखील" –फिलीप्पै ४:७

"ज्याने येशूला मेलेल्यांतून उठाविले त्याचा आत्मा जर तुम्हांमध्ये वास करितो तर ज्यानें ख्रिस्ताला मेलेल्यांतून उठविले तो तुम्हांमध्ये वास करणाऱ्या आपल्याला आपल्या आत्म्यानें तुमचींमर्त्य शरीरे जीवंत करील." –रोम ८:११

"देवानें प्रभूला उठविलें, आणि तो आपल्या सामर्थ्यानें आपल्याला उठवील."

–१ले करिंथ ६:१४

"माझ्या पित्याची इच्छा हीच आहे कीं जो कोणी पुत्राला पाहून त्याजवर विश्वास ठेवितो त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावें, त्याला शेवटल्या दिवशी मी उठवीन"–योहान ६:४०

"येशूनें तिला म्हटलें, पुनरुत्थान व जीवन मीच आहें, जो मजवर विश्वास ठेवितो, तो मेला असला तरी जगेल. अणि तो जीवंत असून मजवर विश्वास ठेवितो तो कधींही मरणार नाहीं." –योहान ११:२५,२६अ

"तरीपण ख्रिस्त महानिद्रा घेतलेल्यांतले प्रथम फळ असा मेलेल्यांतून उठविला गेला आहेच. मनुष्याच्या द्वारें मरण आलें, म्हणून मनुष्याच्या द्वारें मेलेल्यांचे पुनरुत्थानही आहें. जसे आदामामध्यें सर्व मरतात तसे ख्रिस्तामध्यें सर्व जींवत केले जातील. पण प्रत्येक आपापल्या कर्माप्रमाणे, प्रथम फळ ख्रिस्त, मग ख्रिस्ताच्या आगमनकाळी जे त्याचे होणार ते लोक"

–१ले करिथ १५:२०–२३

"कारण मी जीवंत आहें, आणि तुम्हीही जीवंत राहाल." –योहान १४:१९ब

"आपण ख्रिस्ता बरोबर मेलों तर, त्याजबरोबर जीवंत होऊनही राहू असा आपला विश्वास आहें." –रोम ६:८

# "या महान तारणाचा अव्हेर करुं नका"

"मोशाचे नियमशास्त्र कोणीं तुच्छ मानिलें तर त्याजवर दया न होतां त्याला 'दोघांच्या किंवा तिघांच्या साक्षीवरून मरणदंड होतो' तर ज्यानें देवाच्या पुत्राला पायाखालीं तुडविलें, जेणेंकरुन तो स्वत: पवित्र झाला होता तें 'कराराच रक्त' अपवित्र मानिले, आणि कृपेच्या आत्म्याचा अपमान केला तो किती अधिक कठीण दंडास पात्र ठरेल म्हणून तुम्हांस वाटते." -ईब्री १०:२८-२९

"जो मला अव्हेरितो व माझ्या वचनांचा स्वीकार करीत नाही त्याचा न्याय करणारा एक जण आहें, जें वचन मीं सांगितले तेंच शेवटल्या दिवशी त्याचा न्याय करीलं."

-योहान १२:१४८

"ह्यामुळें मीं तुम्हांस सांगितले कीं तुम्हीं आपल्या पापांत मराल, कारण मी तो आहें असा विश्वास तुम्हीं न धरिल्यास तुम्ही आपल्या पापांत मराल." -योहान ८:२४

"तुम्हां माझ्या मित्रांस मी सांगतो, जे शरीराचा वध करितात पण त्यानंतर ज्यांच्याने आणखी कांही करवत नाही त्यांची भीति बाळगू नका. तुम्हीं कोणाची भीति बाळगावी हें मी तुम्हांस सुचवितों, जीव घेतल्यावर नरकांत टाकावयास ज्याला सामर्थ्य आहे त्याची भीति बाळगा, हो, मी तुम्हांस सांगतो त्याचीच भीति बाळगा."

-लूक १२:४, ५

"तर आपण एवढया मोठया तारणाची उपेक्षा केल्यास कसे निभावू?" -इब्री २:३अ

"परन्तु जो पुत्राला मानीत नाहीं त्याच्या दृष्टीस जीवन पडणार नाही, देवाचा क्रोध त्याजवर राहतो." -योहान ३:३६ब

# "येशू आमचा न्याय करील"

"त्यानें असा एक दिवस नेमस्त केला आहे कीं त्या दिवशी आपण नेमिलेल्या मनुष्याच्या द्वारें तो जगाचा न्यायनिवाडा नीतिमत्वाने करवील, त्यानें त्याला मेलेलयांमधून उठवून याविषयींचें प्रमाण सर्वास पटविले आहें."

-प्रेषित १७:३९

"पिता कोणाचाहि न्याय करीत नाहीं, तर सर्व न्याय करण्याचें काम त्याने पुत्राकडे सोपून दिलें आहें. यासाठी कीं जसा पित्याचा सन्मान करितात तसा पुत्राचाहि सन्मान सर्वांनी करावा. जो पुत्राचा सन्मान करीत नाहीं तो, ज्यानें मला पाठविलें, त्या पित्याचा सन्मान करीत नाहीं."

-योहान५:२२-२३

"कारण आपणां सर्वांस ख्रिस्ताच्या न्यायासनासमोर खऱ्या स्वरुपानें प्रगट झालें पाहिजे, यासाठीं कीं प्रत्येकाला, त्यानें देहानें केलेल्या गोष्टींचे फळ मिळावे, मग त्या बऱ्या असोत किंवा वाईट असोत."

- २रे करिंय ५:७०

"ज्या दिवशी देव माझ्या सुवार्तेप्रमाणे येशू ख्रिस्ताच्या द्वारें मनुष्यांच्या गुप्त गोष्टींचा न्याय करील."

-रोम २:१६अ

"प्रभु येशू आपल्या सामर्थ्याच्या दूतांसह स्वर्गांतून 'अग्नि ज्वाला विष्ठित' असा प्रकट होण्याच्या समयी होईल. तेव्हां 'जे देवाला ओळखत नाहींत' व आपल्या प्रभु येशूची सुवार्ता मानीत नाहींत त्यांचा तो सूड उगवील."

-२थेस्सल १:७ब८

"आतां, ज्या माझ्या वैऱ्यांच्या मनांत मीं त्यांजवर राज्य करुं नये असें होतें त्यांस एथें आणा, व माझ्यासमोर मारुन टाका."

-लूक १९:२७

# "येशुचे शिष्य म्हणवणारे सर्वच येशूचे शिष्य नाहीत"

"आपण देवाला ओळखितो असें ते बोलून दाखवितात, परन्तू कृतींनी त्याला नाकारितात."

–तीत १:१६अ

"जर कोणाला ख्रिस्ताचा आत्मा नाहीं तर तो त्याचा नाही." –रोम ८:९ब

"जनसभेंतल्या प्रमाणें ते तुजकडे येऊन माझ्या लोकांच्या रीतीप्रमाणे तुजपुढे बसतात, ते तुझी वचनें ऐकतात, पण त्यांप्रमाणे चालत नाहींत, ते तोंडाने गोडगोड गोष्टी बोलतात पण त्यांचे मन लोभवश झालें आहें." –यहेज्केल ३३:३१ब

"हे लोक ओठांनी माझा सन्मान करितात परंतु त्यांचे अंत:करण मजपासून दूर आहे"

–मत्तय १५:८

"मला प्रभुजी, प्रभुजी, असें म्हणणाऱ्या प्रत्येकाचा प्रवेश स्वर्गाच्या राज्यांत होईल असें नाहीं, तर जो माझ्या स्वर्गीय पित्याच्या प्रमाणे वर्ततो त्याचा होईल. त्या दिवशी मला बहुत म्हणतील, प्रभुजी, प्रभुजी, 'आम्ही तुमच्या नांवामें संदेश दिला,' तुमच्या नांवाने भूतें घालविलीं, व तुमच्या नांवाने बहुत अद्‌भुत कृत्ये केलीं नाहीत काय? तेंव्हां मी त्यांस स्पष्ट सांगेन कीं माझी तुमची कधीच ओळख नव्हती, 'अहो अधर्म करणाऱ्यांनो, मजपुढून निघून जा."

–मत्तय ७:२१–२३

"तसे तुम्ही बाहेरुन लोकांस धार्मिक दिसतां, परंतु आंत ढोंगानें व अधर्मानें भरलेले आहां."

–मत्तय २३:२८

# "येशूचे खरे शिष्य त्याची आज्ञा पाळतात"

"आपण त्याच्या आज्ञा पाळिल्या म्हणजे आपण त्याला ओळखतों हें आपणांस कळून येतें"
-१ले योहान २:३

"मी तुमच्या ठायीं माझा आत्मा घालीन आणि तुम्ही माझ्या नियमांनी चालाल, माझे निर्णय पाळून त्यांप्रमाणे आचरण कराल असें मी करीन."
-यहेज्केल ३६:२७

"आणि सिद्ध होऊन ती आपल्या आज्ञेंत राहणाऱ्या सर्वांचा युगानुयुगाचा तारणकर्ता झाला."
-इब्री ५:९

"आणि पापापासून मुक्त होऊन तुम्ही नीतिमत्वाचे दास झालां, म्हणून देवाची स्तुति असों."
-रोम ६:१८

"आपण चांगली कर्मे करावी म्हणून ख्रिस्त येशूमध्ये उत्पन्न केलेले असे आपण त्याच्या हातचे काम आहों, ती कर्में आपण करावी म्हणून देवानें तीं पूर्वी योजून ठेविली."
-इफिस २:७०

"जर ख्रिस्त तुम्हांमध्यें आहे तर पापामूळे जरी शरीर मेलेलें आहे, तरी नीतिमत्वामुळें आत्मा जीवमय आहे. जर तुम्ही आत्म्याने शरीराची कर्मे मारुन टाकिता तर जीवंत राहाल."
-रोम ८:७०, १३

"जो कोणी प्रभुचे नाम घेतो त्यानें अनीतीपासून दूर राहावें"
-२ तिमथी २:१९ब

"तेंव्हा पेत्राने व इतर प्रेषितांनी उत्तर केलें, आम्ही मनुष्यापेक्षा देवाला मानिलें पाहिजे."
-प्रेषित ५:२९

# "जग येशूच्या शिष्याचा द्वेश करते"

"जग तुमचा द्वेष करितें, तर तुमचा द्वेष करण्यापूर्वी त्याने माझाही केला हें तुम्हांस माहीत आहे. तुम्ही जगाचे असतां तर जगानें स्वकीयांवर प्रीति केली असती; परंतु तुम्ही जगाचे नाहीं, मीं तुम्हांस जगांतून निवडिले आहे, म्हणून जग तुमचा द्वेष करिते." -योहान १५:१८:१९

"अशी वेळ येत आहे कीं जो कोणी तुमचा जीव घेईल त्याला आपण देवाला सेवा अर्पण करितों असें वाटेल, ते असें करितील, कारण त्यांनी पित्याला व मलाही ओळखिले नाही." -योहान १६:२ब-३

"आपल्याला देवाची मुलें हें नांव मिळालें यांत पित्यानें आपल्याला केवढें प्रीतिदान दिले आहे तें पाहा, आणि आपण तसें आहोंच. यामुळें जग आपल्याला ओळखीत नाहीं, कारण त्यानें त्याला ओळखले नाही." -१योहान ३:१

"कारण आपणांला पुष्कळ संकटातून देवाच्या राज्यात जावें लागतें." -प्रेषित २८:२२ ब

"जे ख्रिस्त येशूमध्ये सुभक्तीने आयुष्य घालावावयास पाहतात त्या सर्वांचा छळ होईल."- २ रे तिमर्थी ३:१२

"जगात तुम्हास क्लेश होतील तरी धीर धरा, मी जगाला जिंकले आहें." -योहान १६:३३ ब

"मी तुझे वचन त्यांस दिले आहें, जगानें त्यांचा व्देष केला, कारण झसा मी जगाचा नाही तसे तेही जगाचे नाहींत." -योहान १७:१४

"त्याजवर तुम्ही 'आपली' सर्व 'चिन्ता टाका' कारण तो तुमची काळजी घेतो."
-१ रे पेत्र ६:७

"तू भिऊ नको, कारण मी तुझ्या बरोबर आहें. घाबरू नको, कारण, मी तुझा देव आहें, मी तुला शक्ती देतों, तुझें सहाय्यहि करितो, मी धार्मिकतेच्या उजव्या हाताने तु ला सावंरितो."-यशया ४१:१०

"माझ्या आईबापांनी मला सोडिलें आहे तरी परमेश्वर मला जवळ घेईल." -स्तोग २७:१०

"यास्तव आही धैर्याने म्हणतो, 'परमेश्वर माझा सहायकर्ता आहे, मी भिणार नाही, मनुष्य माझें काय करणार?" -इब्री १३:६

"ख्रिस्तांच्या नांवामुळे 'तुमची निंदा होत असल्यास' तुम्ही धन्य आहा, कारण 'गौरवाचा आत्मा' म्हणजे 'देवाचा आत्मा' तुम्हांवर येउन 'राहिला आहें." -१ रे पेत्र ४:१४ ब

"कारण तुझ्या सर्व मार्गात तुझे रक्षण करण्याची तुजविषयी तो आपल्या दिव्यदूतांस आज्ञा देईल."
-स्तोत्र ९१:११

"मृत्युछायेच्या दरींतूनही मी जात असलों तरी अरिष्टांस भिणार नाहीं, कारण तुं मजबरोबर आहेस, तुझी आंकडी व तुझी काठी मला धीर देतात." -स्तोत्र २३:४

"मला सामर्थ्य देणाऱ्याच्या ठायीं मीं सर्व काहीं करावयांस शक्तीमान आहें माझा देव आपल्या संपत्यनुरूप तुमची सर्व गरज ख्रिस्त येशूमध्ये गौखाने पुरविल." -फिलोप्पै ४:१३, १९

# "पाप व सैतानावर विजय"

मनुष्यात सहन होते तिच्याशिवाय दुसरी परीक्षा तुम्हांवर गुदरली नाहीं, आणि देव विश्वासपात्र आहे, तो तुमची परीक्षा तुमच्या शक्ती पलीकडे होऊं देणार नाहीं, तर परीक्षेबरोबर तिच्यांतून निभावण्याचा उपाय करील, असें कीं तुम्हीं ती सहन करावयास समर्थ व्हावें."

–१ ले कदिथ १०:१३

"आपल्याला दया प्राप्त व्हावी आणि गरजेच्या वे ळीं सहाथ्य होण्यासाठी कृपा मि ळावी, म्हणून आपण धैर्याने कृपेच्या राजसनाजवळ जाउं." –इब्री ४:१६

"पण जसा तो प्रकाशांत आहे तसे जर आपण प्रकाशांत चालतो, तर आपली एकमेकांबरोबर भागी आहें आणि त्याचा पुत्र येशू याचे एक आपल्याला सर्व पापांपासून शुद्ध करिते."

–१ले योहान १:७

"तरूणपणाच्या वासनांपासून दूर पळ आणि शुद्ध मनांने प्रभूचा धावा करणाऱ्यांबरोबर नीतिमत्व, विश्वास, प्रीति, शांति यांच्या पाठीस लाग!" –२ तिमयी २:२२

"तसे तुम्हीहीं स्वत:स पापाला मेलेले आणि ख्रिस्त्त येशूमध्यें देवाला जीवंत झालेले, असे माना." –रोम ६:११

"यास्तव देवाच्या आधीन व्हा, सैतानाविरुद्ध आडवे व्हा म्हणजे तो तुम्हांपासुन पळेल."

–याकोष ४:७

"मीं तुझ्या विरुद्ध पाप करुं नये म्हणून मीं आपल्या मनांत तुझें वचन जपून ठेविलें आहें."

–स्तोत्र ११९:११

"कारण जगांत जो आहें त्यापेक्षां तुम्हांत जो आहे तो मोठा आहें." –१ ले योहान ४:४ ब

# "खरी प्रार्थना देवासोबत सहभागीता आहें"

"माझे दर्शन घ्या असें तूं म्हटलें तेव्हां माझें ऱ्हदय तुला म्हणाले हे परमेश्वरा, मी तुझ्या दर्शनाला उत्सुक झालों आहें." –स्तोत्र २७:८

"अहो लोकहो, सर्वदा त्याजवर भाव ठेवा, त्याजपुढें आपलें मन मोकळे करा, देव आपचा आक्षय आहें." –स्तोत्र ६२:८

"हे परमेश्वरा, मला बरें कर म्हणजे मी बरा होईन, मला तार म्हणजे मी तरेन; कारण तूं माझ्या स्तवनविषय आहेस." –यिर्मया १७:१४

"निरंतर प्रार्थना करा, सर्व स्थितींत उपकारस्मरण करा, कारण तुम्हांविषयी ख्रिस्त येशूमध्यें देवाची इच्छा हीच आहें." –१ थेस्सल ५:१७, १८

"तुम्हापैकी जो कोणी ज्ञानानें उणा असेल त्यानें तें देवाजवळ मागावें, म्हणजे तें त्याला मिळेल, कारण तो कोणास दोष न लाविता सर्वास दातृत्वाने देतो." –योकोब १:५

"तुम्हीं मजमध्ये राहिलां व वचनें तुम्हांमध्ये राहिली तर जें कांही तुम्हांस पाहिजे असेल तें मागा तें तुम्हांस प्राप्त होईल."–योहान १५:७

"मी परमेश्वराला शरण गेलों आणि तो मला पावला, त्यानें माझ्या सर्व भयांपासून मला सोडविलें." –स्तोत्र ३४:४

"माझ्या मनांत दुष्कर्माचा विचार असत्ता तर प्रभु माझें न ऐकता हे परमेश्वरा, तूं आपल्या नामासाठी माझ्या दुष्टाईच्या क्षमा कर ती फार झाली आहें." –स्तोत्र ६६:१८, २५:११

"सर्व गोष्टीं विषयी प्रार्थना व विनंती करुन आभार प्रदर्शनासह आपली मागणीं देवाला कळवा." –फिलीप्पै ४:६ ब

# "येशू येत आहे, तैयार रहा"

"कारण, प्रभु स्वतः आद्य दिव्यदूतात्वी वाणी व देवाच्या तुतारीचा आज्ञाध्वनी होत असतां स्वर्गातून उतरेल, आणि ख्रिस्तामध्ये जे मेलेले आहेत ते पहिल्यानें उठतील, मग जीवंत उरलेले आपण त्यांजबरोबर प्रभूला सामोरे होण्यासाठी मेघारुढ असे अंतराळात घेतले जाऊं, आणि तसेच सर्वदा प्रभूजवळ राहूं."

-१येस्सल ४:१६-१७

"यास्तव प्रिय जनहो, आपणाला ही वचनें मिळालीं आहेत म्हणून देहाला व आत्म्याला अशुद्ध करणाऱ्या सर्वांपासून आपण स्वतःला शुद्ध करावें आणि देवाचें भय बाळगून पावित्र्याची परिपूर्ति करावी." -२रे करिंथ ७:१

"तर आतां मुलांनो, त्या मध्यें राहा, यासाठी कीं तो प्रकट होईल तेव्हां आपल्याला धैर्य असावें, आणि त्याच्या येण्याच्या वेळेस त्याज पासून लाजेने माघार घ्यावी लागूं नयें."

-१ले योहान २:२८

"तुम्हीही धीर धरा, आपलीं अंतःकरणे स्थिर करा, कारण प्रभूचें आगमन जवळ आलें आहे, बंधूनों, तुम्ही दोषी ठरुं नये म्हणून एकमेकांबरोबर चिडून कुरकूर करुं नकां, पाहा, न्यायाधीश दारानजीक उभा आहे." -याकोब ५:७-९

"तुम्हीहि सिद्ध असा, कारण तुम्हांस वाटत नाहीं त्या घटकेस मनुष्याचा पुत्र येईल"

-लूक १२:४०

# ''पवित्र आत्म्याने परिपूर्ण व्हा''

''माझा वाग्दंड ऐकून वळा पाहा, मी आपल्या अत्म्याचा वर्षाव तुम्हांवर करीन, मी आपलीं वचनें तुम्हांस कळवीनं'' –नीति १:२३

''पश्चाताप करा, आणि पापांची क्षमा व्हावी म्हणून तुम्ही प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नामांत बातीस्मा घ्या, म्हणजे पवित्र आत्म्याचें दान तुम्हांला प्राप्त होईल'' –प्रेषित २:३ब

''द्राक्षारसाने मस्त होऊं नका, त्यांत बेतालपणा आहे, तर आत्म्यानें पूर्ण होऊन, स्त्रोत्रे गीतें व आत्मिक प्रबंध ही एकमेंकास म्हणून दाखवा, आपल्या अंत:करणात प्रभूला गायनवादन करा. आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या नामानें सर्व गोष्टींबद्दल सर्वदा देवपित्याचें उपकारस्मरण करा, ख्रिस्ताचे भय बाळगून एकमेकांच्या अधीन असा.'' –इफिस ५:१७-२१

''कारण इच्छा करणें व कृति करणें हीं तुमच्या ठायीं आपल्या सत्संकल्पासाठी साधून देणारा तो देव आहे.'' –फिलीप्पें २:१३

''तुम्ही देवाचें मंदिर आहां, आणि तुम्हांमध्ये देवाचा आत्मा वसतो हें तुम्हांस ठाऊक नाही काय? कारण तुम्ही मोलाने विकत घेतलेले आहा, यास्तव तुम्ही आपल्या शरीरानें देवाचें गौरव करा.'' –१ले करिंय ३:१६, ६:२०

''आणि ते सर्व पवित्र आत्म्याने पूर्ण होऊंन देवाचें वचन धैर्यानें बोलूं लागलें.''
–प्रेषित ४:३१ब

मोफत – विक्रीसाठी नाही

Read booklets online or by App
www.wmp-readonline.org

www.wmpress.org

5-21

1580 Marathi HKG